# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.02.2025** **वार:शुक्रवार**

---

1)महाकुंभ म्हणजे एकतेचा महायज्ञ असल्याचे पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2)आयुष क्षेत्रामुळे प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला चालना - पंतप्रधानांचं प्रतिपादन
4)युरोपीय आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन 2 दिवसांच्या भारत दौऱ्यावर
5)राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आज देशभर विज्ञान विषयक उपक्रमांचं आयोजन
आणि
6)बिहारसह पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि नेपाळच्या अनेक भागात भूकंपाचे धक्के

**<u>पंतप्रधान महाकुंभ</u>**

प्रयागराजमध्ये झालेला महाकुंभ हा एकतेचा महायज्ञ ठरला आहे , अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभ मेळ्याची प्रशंसा केली आहे. देशाला आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान असून देश एका नव्या उर्जेनं पुढे जात आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावर लिहीलेल्या एका लेखात पंतप्रधानांनी महाकुंभबाबतचे आपले विचार व्यक्त केले आहेत. आपल्या देशाचं नवीन भविष्य लिहीण्यासाठी सुरू केलेल्या परिवर्तन युगाची ही पहाट आहे असं पंतप्रधानांनी नमूद केलं आहे. महाकुंभ मेळ्यासाठी प्रचंड मोठ्या संख्येनं आलेले भाविक हा केवळ एक संख्याविक्रम नाही, भारतीय संस्कृती आणि परंपरा पुढची अनेक शतकं अशीच समृद्ध आणि सशक्त राहावी यासाठी रचलेला पाया आहे असं त्यांनी म्हटलं आहे. महाकुंभच्या यशस्वी आयोजनात योगदान दिलेल्या सर्वांचे मोदी यांनी आभार मानले आहेत. गेला दीड महिना प्रयागराज इथल्या एकतेच्या विराट मेळाव्यात कोट्यवधी नागरिक श्रद्धेनं एकत्र आल्याचं दिसलं हे खरोखरच खूप उत्साहवर्धक असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**<u>आयुषआढावा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत आयुष क्षेत्राची आढावा बैठक घेण्यात आली. या क्षेत्रानं प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला चालना देण्यात त्याचबरोबर औषधी वनस्पती लागवडीच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वाढीत योगदान दिलं आहे, त्यामुळे जगातील पारंपरिक औषध पद्धतींमधील अग्रणी म्हणून भारताचं स्थान आणखी उंचावल्याचं पंतप्रधानांनी अधोरेखित केलं. जगभरात आयुष पद्धतींना मान्यता मिळत असल्याचं नमूद करत शाश्वत विकास आणि रोजगार निर्मितीला चालना देण्याची या क्षेत्रामध्ये क्षमता असल्याचंही मोदींनी बैठकीत स्पष्ट केलं.

**<u>जहाँएखुस्रो</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील सुंदर नर्सरी इथं आयोजित जहाँ-ए-खुस्रो २०२५ या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सूफी संगीताच्या या भव्य संगीत महोत्सवाचं यंदाचं हे २५ वं वर्ष आहे. हा महोत्सव आजपासून २ मार्च पर्यंत चालणार आहे. अमिर खुस्रो यांच्या परंपरेच्या गौरवार्थ साजऱ्या केल्या जाणाऱ्या या महोत्सवात जगभरातील कलाकार एकत्र येतात.

**<u>गोयल</u>**

मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्वच्छ भारत आणि आत्मनिर्भर भारत यासारख्या सरकारच्या विविध धोरणात्मक उपक्रमांमुळे देशाची मानसिकता, लवचिक, स्वावलंबी झाली आहे. जागतिक व्यापारात भारत एक मोठं नेतृत्व ठरला आहे असं कैंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. भारत कॉलिंग कॉन्फरन्स २०२५ च्या उद्घाटनप्रसंगी ते काल मुंबईत बोलत होते. विकसित भारत २०४७ चा मार्ग – सर्वांसाठी समृद्धीचा प्रारंभ ही या परिषदेची संकल्पना आहे.

विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारताला आपले व्यवसाय आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खुले करावे लागतील. व्यावसायिकांनी दर्जाबाबतची आधुनिक मानांकनं स्वीकारुन आपली परिसंस्था चांगला दर्जा राखण्याच्या दृष्टीने प्रशिक्षित असल्याची तसंच उत्पादन प्रक्रियेच्या चांगल्या पद्धतींचा अवलंब करत असल्याची खबरदारी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

**<u>राष्ट्रीयविज्ञान</u>**

देशभरात आज राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जात आहे. प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन यांनी 'रामन इफेक्ट'चा शोध लावल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी हा दिवस साजरा केला जातो. या अभूतपूर्व शोधासाठी सर रामन यांना १९३० मध्ये नोबेल परितोषिकांनं सन्मानित करण्यात आलं.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त देशभरात विविध वैज्ञानिक उपक्रमांचं आयोजन करण्यात येतं. विज्ञानाचं महत्त्व आणि त्याचा वापर लोकांपर्यंत पोहोचवणं हा या दिवसाचा उद्देश आहे.कैंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह नवी दिल्लीत आज होणाऱ्या 'राष्ट्रीय विज्ञान दिन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. जागतिक नेतृत्वासाठी भारतीय युवकांना नवोन्मेश आणि विज्ञानात सक्षम करणे ही आजच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची संकल्पना आहे.

**<u>ईयूअध्यक्षभारत</u>**

युरोपिय आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन 2 दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीत त्यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करणार आहेत. युरोपिय संघाच्या २२ आयुक्तांसह त्या काल दिल्लीत दाखल झाल्या. भारत आणि युरोप हे २००४ पासून सामरिक भागीदार असून त्यांचे

द्विपक्षीय संबंध विविध क्षेत्रांमध्ये विस्तारले आहेत.या भेटीमुळे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे.

**<u>ट्रम्पटेरिफ</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून होणाऱ्या मालाच्या आयातीवर आणखी १० टक्के आयात शुल्क लागू करण्याची घोषणा केली आहे. याशिवाय कॅनडा आणि मेक्सिकोमधून होणाऱ्या आयातीवरही पुढील मंगळवारपासून आयात शुल्क आकारण्याचा त्यांचा विचार आहे. चीनमधून अमेरिकेत होणाऱ्या आयातीवर अगोदरच फेब्रुवारीच्या सुरुवातीपासूनच किमान १० टक्के कर आकारण्यात येत आहे. तर कॅनडा आणि मेक्सिकोमधून होणाऱ्या आयातीवर ४ मार्चपासून २५ टक्के आयात शुल्क आकारलं जाणार असल्याचं अध्यक्ष ट्रम्प यांनी स्पष्ट केलं. या दोन्ही देशांचे अधिकारी आयात शुल्क आकारणीची योजना रद्द केली जावी याकरिता चर्चा करण्यासाठी काल वॉशिंग्टन इथं आले असतानाच ट्रम्प यांनी घोषणा केली.

**<u>नड्डाओडिशादौरा</u>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जेपी नड्डा ओडिशाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून आज ते भारतातील सार्वजनिक आरोग्य सेवा प्रणालीतील  नवोन्मेशावरील 9 व्या राष्ट्रीय शिखर परिषदेचे उद्घाटन करतील. या समारंभाला ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, आरोग्यमंत्री डॉ. मुकेश महालिंग आणि विविध राज्यांचे आरोग्य सचिव उपस्थित राहण्याची शक्यता आहे. शिखर परिषदेनंतर नड्डा पुरीतील श्री जगन्नाथ मंदिराला भेट देतील. पुरी इथं 16व्या सामायिक आढावा मोहिमेच्या अहवालाचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातर्फे या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

**<u>दिल्लीकॅग</u>**

दिल्लीतील यापूर्वीच्या आम आदमी सरकारशी संबंधित महानियंत्रक आणि महालेखा नियंत्रक अर्थात कॅगचा अहवाल आज दिल्ली विधानसभेत सादर करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवा व्यवस्थापन याविषयीचा हा अहवाल आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता या अहवालाच्या प्रती विधासभेत मांडणार आहेत. तीन दिवसांपूर्वी आप सरकारच्या मद्य धोरणाचा अहवाल विधानसभेत सादर करण्यात आला होता.

**<u>ओमबिर्ला</u>**

भारतीय तरूण जगात सर्वात बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली असून जगातील मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल पुण्यात केलं. भारती

अभिमत विद्यापीठाचा 26वा पदवी प्रदान समारंभ बिर्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला; त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या विकासात पुण्याने मोठं योगदान दिलं असून पुणे ही समाज सुधारकांची भूमी असल्याचं बिर्ला म्हणाले.

**<u>जयशंकरनृत्यमहोत्सव</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ  एस जयशंकर आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी काल नवी दिल्लीत आयोजित वसुधैव कुटुंबकम या 10 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय नृत्य आणि संगीत महोत्सवात  सहभाग घेतला.

या महोत्सवात भारत, रशिया, मंगोलिया आणि रवांडाचे कलाकार सहभागी झाले आहेत. हे सादरीकरण वसुधैव कुटुंबकमच्या भावनेचं प्रतीक असल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. यमुनेच्या काठावरील बांसेरा उद्यानात हा विशेष कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद आणि दिल्ली विकास प्राधिकरणाचं  कौतुक केले.

**<u>क्रिकेट</u>**

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज अफगाणीस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना होणार आहे. लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये दुपारी अडीच वाजता हा सामना सुरू होणार आहे. काल रावळपिंडीमध्ये यजमान पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला.

**<u>बिहारभूकंप</u>**

बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि नेपाळच्या अनेक भागात आज पहाटे 5 पूर्णांक 5 रिश्टर क्षमतेच्या भूकंपाचे धक्के बसले. अमेरिकेच्या भौगोलिक सर्वेक्षणानुसार नेपाळच्या बागमती प्रांतात पहाटे २ वाजून ३६ मिनिटांनी ५ पूर्णांक ५ रिश्टर क्षमतेचा भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये असल्याचं अमेरिकेच्या भूकंपशास्त्र केंद्रानं म्हटलं आहे. पश्चिम बंगालमधील सिलिगुडी, बिहारमधील दरभंगा, सिक्कीममधील काही भाग आदि ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले.

**<u>हिमाचलबर्फवृष्टी</u>**

हिमाचल प्रदेशातल्या उंच भागात हलकया  ते मध्यम स्वरूपाची बर्फवृष्टी सुरू असल्याने आणि मध्य आणि खालच्या डोंगराळ भागात अधूनमधून पाऊस पडत असल्याने अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. मुसळधार बर्फवृष्टीमुळे शिमला जिल्हयातील नारकंडा जवळील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५ बंद करण्यात आला असून शिमला जिल्हयात एकंदर १२ रस्ते बंद आहेत.कुल्लू जिल्हयातील तोष गावात कृत्रिम तलाव तयार झाल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे तिथल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं आहे.

हवामान खात्याने लाहौल आणि स्पीती, चंबा, किन्नौर आणि 2,300 मीटरपेक्षा जास्त उंचीच्या भागात हिमस्खलनाचा धोका असल्याचा केशरी बावटा जारी केला आहे. हिमस्खलनाचा धोका असलेल्या उंच भागात नागरिकांनी अनावश्यक प्रवास करू नये अशी सूचना हवामान विभागानं केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.